स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 04–08–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 14. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 15. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 16. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. अजिज शेख, अति. आयुक्त (2)
2. श्री. नितीन कापडणीस, उपायुक्त (2)
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 181ः–** **{बाजार विभाग}** लक्ष्मीनगर झोन क्र. 1 अंतर्गत असलेले परंतु सध्या धरमपेठ झोन क्र. 2 मध्ये समाविष्ठ असलेले कामगार कॉलनी सुभाषनगर येथे बाजार विभाग, म.न.पा. मालकीची 5 दुकाने असुन, यापैकी दुकान क्र. 1 चे आवंटन यापुर्वी जाहिर लिलावाव्दारे करण्यात आलेले असुन, उर्वरीत दुकान क्र. 2,3,4 व 5 यांना लिलाव प्रक्रियेत प्रतिसाद न मिळाल्याने सद्यःस्थितीत रिक्त आहे. रिक्त असलेल्या या चार दुकानांपैकी दोन दुकानांची दिपस्थंभ धर्मदायी संस्थेने, धर्मदाय कार्याकरीता मागणी केली आहे.

उक्त चार दुकानांचे अद्यापपावेतो आवंटन न झाल्याने त्यापासुन म.न.पा.स कुठलेही आर्थीक उत्पन्न प्राप्त होत नाही. अर्जदार दिपस्थंभ धर्मदायी संस्था यांना दोन दुकानांचे आवंटन केल्यास म.न.पा.स सिध्द शिघ्र गणकाचे दरानुसार दुकानाचे मुल्य तसेच प्रतिमाह परवाना शुल्क प्राप्त होवु शकेल.

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमाचे **कलम 332 (ब)** अन्वये आयुक्तांना स्थायी समितीच्या मान्यतेने महानगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु–आवारातील कोणत्याही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यावर आकारणी योग्य असलेले दुकान भाडे, भाडे आणि फि किंवा त्याचा कोणताही भाग एकावेळी एकापेक्षा अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याने देण्याची तरतुद असुन, **कलम 332 (क)** अन्वये योग्य वाटेल अशा मुदतीसाठी आणि अशा शर्तीवर जाहीर लिलावाने देण्याचे किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगीरीत्या विक्री करून विनियोग करण्याची तरतुद आहे.

रिक्त असलेल्या चारही दुकानांचे क्षेत्रफळ प्रत्येकी 9.30 चौ.मी. (100 चौ.फुट) असुन सिध्द शिघ्र गणकाचे दरानुसार त्याचे एका दुकानाचे मुल्य रू. 7,01,552/– निश्चित करण्यात आले आहे. तसेच मासिक परवाना शुल्क रू. 4,580/– निश्चित करण्यात आले आहे.

वरील कलमाला अनुसरून वर निश्चित केलेले एका दुकानाचे मुल्य व प्रतिमाह परवाना शुल्कावर कामगार कॉलनी सुभाषनगर परिसरातील म.न.पा.च्या मालकीच्या रिक्त असलेल्या चार दुकानांपैकी (क्र. 2,3,4 व 5) दोन दुकाने दिपस्थंभ धर्मदायी संस्था यांना 11 महिन्याच्या अस्थायी परवान्यावर आवंटीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 332 (अ) अनुषंगाने प्रस्तावित विषयातील गाळे गलिच्छ वस्तीमध्ये येत असल्यामुळे तसेच गरीब मुलांना निःशुल्क शिक्षण ही संस्था करीत असल्यामुळे प्रस्तावित गाळे रु. 2000/– प्रतिमहा देण्यात यावे या मा. स्थायी समिती सदस्या सौ. सोनाली कडू यांनी केलेल्या सूचनेस तसेच, उपरोक्त गाळा एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 182:–**
**{क्रीडा व सांस्कृ. विभाग}**

नागपूर महानगरपालिकेचे गणेशनगर स्केटिंग रिंक (प्रभाग क्र. 31) कंत्राटी पद्धतीने 3 वर्ष चालविण्याकरिता व देखभाल करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे. निविदेच्या अटी व शर्ती नमुन्यात दिलेल्या असून सदर कामाकरिता निविदा आमंत्रित करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीची अनुमती करीता प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 183:–**
{सा.प्र.वि.}

सी. सी. रोड फेज–2 अतंर्गत नागपूर शहरातील रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याकरीता 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर अनुज्ञेय पारिश्रमीक मासिक वेतनावर पदवीधर साईट इंजिनिअर, पदवीकाधारक सुपरवाईजर, आय. टी.आय. धारक सुपरवाईजर यांचे जाहिरात क्र. 292/पी. आर. दि. 27/09/2016 नुसार प्रत्यक्ष मुलाखती घेवुन नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले होते.

कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या एकुण 43 कर्मचाऱ्यांचा फेर नियुक्तीचा कालावधी दि. 03/07/2018 ला संपला असल्यामुळे विभागाचे शिफारसीनूसार व आवश्यकतेनुसार त्यांना दोन दिवसाचा तांत्रीक खंड देणेबाबत तसेच दि. 06/07/2018 पासुन पूढील 6 महिन्याकरीता एकुण 43 कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदत वाढ देण्याचा व या 43 कर्मचाऱ्यांच्या 6 महिन्याच्या वेतनावर होणाऱ्या अंदाजे रू. 50 लाख खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन फेज–2 च्या कामाव्यतिरिक्त फेज–1 अपूर्ण कामे व फेज–3 चे नवीन कामे सुद्धा यांचेकडुन सुपरवाईज करावी तसेच यांच्या कामाचा प्रशासकीय व तांत्रिक अहवाल विभागाप्रमुखाने घ्यावा, व तसा अहवाल स्थायी समिती समोर पुढील मुदत वाढीच्या वेळीस सादर करावा या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 184</u>:— नागपूर महानगरपालिकेद्वारे कचरा संकलन व वाहतुक **{आरोग्य विभाग}** करण्याचे कंत्राट देण्यात आलेले असून तत्कालिन आयुक्तांनी दिलेल्या सुचनेनुसार मे. कनक रिर्सोसेस प्रा.लि. त्या कामगार कायदयातील तरतुदीतिल दि. २४/०२/२०१५ अधिसुचने नुसार वाढलेले दर देणे शक्य नसल्यामुळे WPI प्रमाणे होणाऱ्या वाढीऐवजी प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाच्या आधारे दर सुधारित करण्याचा निर्णय मा. आयुक्त यांच्या अधिनिस्त गठीत समितीत घेण्यात आलेल्या असून रु. १३०६.८५ प्रतिटन हा दर फिक्स ठरविण्यात आला. व यास मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१ दि. १५/०५/२०१७ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सबब जुलै २०१६ पासून उक्त दर देय राहील. व नविन निविदा प्रक्रिया होईस्तोवर याच दराने कंपनी कार्यरत राहील. तसेच जुलै २०१६ ते मार्च २०१७ पर्यंतच्या वाढीव फरकाचे देयक चौकशी अहवाल प्राप्त होत पर्यंत मनपाने रोखुन ठेवलेला आहे.

मे. कनक रिर्सोसेस मॅनेजमेंट लि.कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने शासन परिपत्राक क्र. प्र.वि./कि.वे.अ/२०१८—१ /कार्या १० किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार वाढीव भत्ता कमी कर्मचाऱ्यांना देण्याकरिता अतिरिक्त भुगतानाची मागणी विभागाला केलेली आहे. १ जुलै २०१६ ते मार्च २०१७ या ९ महिन्यांचा वाढीव बाबत फरकाची रक्कम कनकचा रोखून धरलेला असल्यामुळे कंपणिने कामगारांना १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ पावेतो देय असलेल्या वाढीव भत्ता फरकाची रक्कम दिलेली नाही.

दि. २९/०६/२०१७ ला सदर बैठकीत मा. आयुक्त, कमलेश शर्मा व श्री. प्रभुणे यांच्या सहमतीने कनकने एप्रिल मे, जुन पेड इन जुलै १७ मध्ये द्यावा असे ठरविले. यापुढे दर सहामाही वाढणारा DA देण्याकरीता स्थायी समिती पुढे उचित प्रस्ताव विभागाने दयावा असे मा. आयुक्त यांनी विभागाला सुचित केले.

- जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७ पर्यंत शासनाने कुठलाही DA ची वाढ दिलेली नाही.
- कामगार आयुक्त यांचे पत्र दि. ६/०२/२०१६ अन्वये दिनांक १ जानेवारी २०१८ ते दि. ३० जुन २०१८ पर्यंतची वाढ लगत पुर्वीच्या दर ३०८०/— वरून ३५००/— एवढी वाढ आहे. म्हणजेच रू. ४२० एवढी वाढ झालेली आहे. उक्त इतिवृत्तानुसार तो फरक मा. स्थायी समितीच्या मान्यतेने दयावयाचा आहे देय परिगणनेची रक्कम खालीलप्रमाणे येते.

प्रती कर्मचारी DA वाढ 420 रु.
त्यावर 4.5% दराने ESIC रु. 27.30
एकुण प्रती कर्मचारी प्रती माह रु. 447.30

ज्यावेळी मा. आयुक्तांनी सुधारीत दर रु. १३०६.८१६ मंजुर केला त्यावेळेची कर्मचारी संख्या 1531x447.=6,84,816.30 Rounded to 6,84,816 प्रतिमाह खर्च वाढेल. हा खर्च वजनाचे प्रमाणात होणारे देयका व्यतीरीक्त देणे योग्य असून विभागाच्या निवेदनाप्रमाणे व सुचनेनुसार वरील विषय विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यापूर्वी स्थायी समितीने कचरा संकलन व वाहतून करण्याचे कंत्राटाची निविदा लवकरात लवकर विभागाने काढाव्या असे ठरावा द्वारे निर्देशीत करण्यात आले. अद्याप या निविदा काढण्यात आल्या नाही ही स्थायी समिती विभागास निर्देश देते की, 15 दिवसाच्या आत उपरोक्त निविदा प्रकाशित करण्यात याव्या आणखी असे की, जो पर्यंत या निविदा प्रकाशित होत नाही तो पर्यंत प्रस्तावित विषय स्थगित करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 185</u>:— प्रभाग क्र. २६ ड अंतर्गत श्रीकृष्ण नगर येथील युवा **{लोककर्म झोन 05}** चौक ते वाठोडा पांधन रोडचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकारांपैकी निम्मतम

निविदाकार मे. आर. एम. दयारामानी यांची मुळ प्राक्कलनीय दरापेक्षा १७.००% ने कमी (नविन CSR दरापेक्षा १५.०५% ने कमी) दराची रू. १,०५,६३,६९४/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 186</u>:—** म.न.पा. मुख्यालयातील नविन प्रशासकीय इमारतीमधील
**{विद्युत विभाग}** शिल्लक फायर फायटींग सिस्टम चे काम करण्याकरीता प्राकलनीय राशीपेक्षा 13.51% ने कमी असलेली रू. 1,24,83,255/— ची निम्नतम दराची मेें. एस. आर. असोशिएटस्, नागपूर यांच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 187</u>:—** प्रभाग क्र. 14 अंतर्गत सी.पी. क्लब ते तेलंगखेडी
**{विद्युत विभाग}** हनुमान मंदिर, मदर डेअरी पर्यंतच्या रस्त्यावर खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता मेें. निशांत इलेक्ट्रिकल्स्, नागपूर यांची प्राकलनीय राशीपेक्षा 1. 55% ने कमी असलेली रू. 26,42,231/— ची निम्नतम दराच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 188</u>:—** प्रभाग क्र. ३५, इंडस्ट्रीयल विकर सेक्सन सोसायटी गौरव
**{प्रकल्प विभाग}** कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण रूपये ५२२४०९६/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, डी.सी. गुरूबक्षानी यांची प्राकलनिय दर प्रमाणे रूपये ५२२४०९६/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली

**<u>ठराव क्रमांक 189</u>:—** प्रभाग क्र. 2 (ड) अंतर्गत कामगार नगर म.न.पा. शाळे करिता
**{लोककर्म झोन क्र. 9}** सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. 49,96,992/— व निविदा किंमत रु. 43,16,986/— च्या कामाकरिता प्राप्त तीन निविदांपैकी, मे. हितेश कंस्ट्रक्शन यांच्या, निविदा किंमती पेक्षा 5.60 टक्के कमी दराच्या रू. 37,39,333/— निम्नतम निविदेस तथा त्यावरील 12 टक्के जी.एस.टी व 1 टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. 42,70,645/—(रुपये बेचाळीस लक्ष सत्तर हजार सहांशे पंचेचाळीस) च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर्हु कामाकरिता पद क्र. A45202072702 अंतर्गत रु. 37,79,333/— चे प्रावधान उपलब्ध करण्यात आले असून कामाचा खर्च तरतूद राशी पर्यंत मर्यादित राहिल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 190</u>:—** नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील नविन प्रशासकीय
**{विद्युत विभाग}** इमारतीमधील सातव्या माळयावरील स्मार्ट सिटी व सस्टेनेबल डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशन लि. नागपूर कार्यालयाचे विद्युतिकरण करण्याकरीता मेें. आर. सन्स., नागपूर यांची प्राकलनीय राशीपेक्षा 0.75% ने कमी असलेली रू. 52,50,502/— ची निम्नतम दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 191</u>:—** दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा श्री. गणेशमुर्ती विसर्जनामुळे
**{आरोग्य विभाग}** तलावात होणारे प्रदुषण थांबविणे व पर्यावरणाचा समतोल राखणे या करीता नागपूर महानगरपालिकेच्या १० झोन अंतर्गत गणपती विसर्जनाकरीता विविध आकाराचे कृत्रिम तलाव निविदा मागवून खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

झोन निहाय कृत्रिम तलावांची आवश्यकता तपासून झोन निहाय माहिती संकलीत करण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे

| कृत्रिम तलाव साईज | झोन क्रं. 1 | झोन क्रं. 2 | झोन क्रं. 3 | झोन क्रं. 4 | झोन क्रं. 5 | झोन क्रं. 6 | झोन क्रं. 7 | झोन क्रं. 8 | झोन क्रं. 9 | झोन क्रं. 10 | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **12' X 30"** | **6** | **12** | **5** | **7** | **4** | **4** | **3** | **3** | **1** | **8** | **53** |
| **15'X36"** | **10** | **--** | **10** | **10** | **10** | **3** | **4** | **5** | **1** | **6** | **59** |

वरील प्रमाणे १२ फुट X ३० इंच आकाराचे ५३ नग कृत्रिम तलाव आणि १५ फुट X ३६ इंच आकाराचे ५९ कृत्रिम तलाव असे एकुण ११२ नग कृत्रिम तलावाबाबत मागणी प्राप्त आहे. या व्यतीरीक्त वेळ प्रसंगी कृत्रिम तलावांची तुटफुट झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्याकरीता विभागाकडे १२ फुट X ३० इंच आकाराचे २ नग व १५ फुट X ३६ इंच आकाराचे १ नग विभागाकडे अतिरीक्त राखून ठेवणे आवश्यक आहे. जेणे करुन आवश्यकतेनुसार तातडीने पुरवठा करणे योग्य होईल. त्यानुसार विभागाला १२ फुट X ३० इंच आकाराचे ५५ नग आणि १५ फुट X ३६ इंच आकाराचे ६० नग खरेदी करणे आवश्यक आहे. सदर खरेदी पोटी रु. ६० लक्ष खर्च अपेक्षित आहे. उक्त खर्च विभागाचे व्यय पद क्रं. A44201272202 अथवा जिल्हा नियोजन समिती कडून नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत निधी प्राप्त झाल्यास त्यामधून उक्त खर्च भागविण्यात येईल.

कृत्रिम तलावाकरीता मा. खासदार/मा. आमदार यांची मागणी होत असते व त्यांनी केलेली बहुतांश मागणी ही ३२ फुट X १६ फुट X ५२ इंच या आकाराचे २४ फुट X १२ फुट X ५२ इंच या आकाराचे १८ फुट X ९ फुट X ५२ इंच या आकाराच्या तलावांची असते व त्याकरीता मा. खासदार/मा. आमदार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. या मोठया आकाराची खरेदी मनपा निधी मधून करावयाची नाही. परंतू मा. खासदार/मा. आमदार यांचे मागणीनूसार कृत्रिम तलाव उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. करीता मोठया आकाराच्या कृत्रिम तलावांची दर निश्चित करणे आवश्यक आहे. जेणे करुन मा. आमदार/मा. खासदार यांची मागणी प्राप्त होताच ती उपलब्ध करुन देणे शक्य राहील.

करीता पर्यावरण पूरक गणेश विसर्जनासाठी वर नमुद विविध आकारांची कृत्रिम तलावांची खरेदीकरीता ई—निविदा मागवून दर निश्चिती करणे आवश्यक आहे. सदर निश्चिती बाबतचा करार किमान दोन वर्षाकरीता लागू करणे योग्य राहील.

त्यानुसार विविध आकाराच्या कृत्रिम तलावांची दोन वर्षाकरीता निविदा दर निश्चित करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 192:— {कार्य अभि प्रकल्प}

नागपूर येथे वर्धा रोड (होटल रेडीसन्स ब्लू) ते सी आर पी एफ या भागात मौजा सोमलवाडा, खामला, भामटी, टाकळी व जयताळा या परिसरातील सलग मनपाच्या मालकीची 30.49 हेक्टर जागेवर ऑरेंज सिटी स्ट्रिट प्रकल्प मनपा व्दारे स्वबळावर राबविण्यास तथा या प्रकल्पाकरीता (प्रकल्पात समाविष्ट component च्या Sales and Marketing करीता) Transaction Advisor ची नियुक्ती करण्यांस मनपा सभागृहाचे ठराव क्र. 125 दि. 16.10.2017 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्यानुषंगाने या प्रकल्पाकरीता Transcation Advisor ची नियुक्ती करण्यांस निविदा मागविल्या असता पहिल्या कॉल मध्ये अपुरा प्रतिसाद मिळाल्याने पुनश्च: निविदा मागविण्यात आल्या. त्यानंतर दुसऱ्या कॉल मध्ये प्राप्त M/s Vestien Global Work Places Services Pvt. Ltd and Venkateshwara Habittat LLP Consortium यांची एकमेव निविदा, या प्रकल्पापासुन मनपास प्राप्त होणाऱ्या महसूली आय चे 4.4 टक्के (four point four percentage) प्रमाणे Success Fees त्यांना मिळण्याचे ऑफर प्राप्त झाले. निविदाकारासोबत समितीमार्फत दर वाटाघाटी अंती त्यांनी सुधारित ऑफर 4.198 टक्के Success Fees प्रमाणे दिले. त्यानुषंगाने

1) M/s Vestien Global Work Places Services Pvt. Ltd and Venkateshwara Habittat LLP Consortiu यांनी या प्रकल्पापासुन मनपास प्राप्त होणाऱ्या महसूली आय वर सुधारीत दर 4.198 टक्के प्रमाणे Success Fees मिळण्याचे ऑफर मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.
2) या कामाकरीता निर्धारित स्कोप ऑफ वर्क प्रमाणे सुरूवातीला Transaction Advisor यांना Activity I व II नुसार केलेल्या कामाचे भुगतान करण्यास्तव रूपये 1.00 कोटी राशी मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

श्री.मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, आणीबाणी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत बोअरवेलची नस्ती तयार करण्यात आली होती व त्याला स्थायी समितीने मंजूरी प्रदान केली होती परंतु त्याचे वर्कऑर्डर आजपावेतो झालेले नाही.

श्री.जुल्फेखार भुट्टो :– मा.सभापती महोदय, आणीबाणी पाणीपुरवठा योजना के अंतर्गत आजतक बोअरवेल नही लगाई गयी है, अगली बैठक मे इस विशय की संपुर्ण जानकारी दी जायें।

सभापती :– अगली सभा मे ओ.सी.डब्लु. के अधिकारीयोंकों सभा मे उपस्थित रहने के आदेष दिये जायें।

<u>ठराव क्रमांक 193</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर